ISSN No. : 2250-1649

# मुराळी

सप्टेंबर, २०१८
मूल्य : २० रुपये



वर्ष अकरावे। अंक एकशे पंचवीस,
सप्टेंबर, २०१८

ISSN No. 2250-164

# परिवर्तनाचा मुराळी

■ संपादक : राजन गवस

■ कार्यकारी संपादक
तुकाराम ऊर्फ टी. एस. गडकरी

■ संपादक मंडळ
आसाराम लोमटे । डॉ. गजानन जाधव ।
संजय खोचारे

■ सल्लागार मंडळ
मेघा पानसरे । तनुजा शिपूरकर ।
सौ. ऊर्मिलादेवी श्रीपतराव शिंदे ।
सुचेता कोरगांवकर । डॉ. सुमन पाटील ।

■ कायदा सल्लागार
ॲड. ए. पी. पाटील (सांगाव कागल)

■ अक्षर जुळणी
आप्पासो बुडके

■ मुद्रणस्थळ
भारती मुद्रणालय, कोल्हापूर

■ व्यवस्थापक
बी. वाय. पाटील, राम मेढेकर
संपर्क फोन नं. : ०८२७५४४९६१६,
०९४२११३८८७२, ९७६५७८७३१३

■ वार्षिक वर्गणी : रु. २००/-, तीन वर्षासाठी : रु. ५००/-
बँक खाते नं. Bank of Baroda, Murali Trust
A/c. No. 38120100000285 IFSC BARBOGARGOT

■ पत्ता : संपादक मुराळी, मु. पो. गारगोटी,
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर. पिन ४१६ २०९

■ अनुक्रमणिका

कृषी समाजाची पुनर्रचना / प्रकाश पवार /४

झुंज / कपिल सातापा पाटील / ११

अस्पृश्यरू (१९९२)- वैदेही (१९४५) ची
वस्तुनिष्ठ कन्नड कादंबरी / शोभा नाईक / १८

खा फणसाचे गरे / डॉ. के. ए. मोमीन / २९

हे मासिक प्रकाशक, मुद्रक राजन गवस यांनी भारती मुद्रणालय येथे छापून मु. पो. गारगोटी येथे प्रसिद्ध केले. या मासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई यांचे अंशतः अनुदान मिळाले आहे. या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई व संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच, असे नाही.

# अस्पृश्यरू (१९९२)– वैदेही (१९४५) ची वस्तुनिष्ठ कन्नड कादंबरी

शोभा नाईक

वैदेही यांचा *उडुपी* जिल्ह्यातील *कुंदापूर* येथील *हेब्बार* या पारंपरिक ब्राह्मण कुटुंबात १९४५ साली जन्म झाला. त्या विवाहानंतर कुंदापूरहून *शिवमोग्गा* येथे आल्या. त्यानंतर *उडुपी* तसेच *मणिपाल* येथे त्यांनी वास्तव्य केले. वासंती हेब्बार विवाहानंतर जानकी श्रीनिवास मूर्ती बनल्या पण *वैदेही* या टोपण नावाने त्या कन्नड वाचकांत प्रसिद्ध आहेत. आजच्या त्या आघाडीच्या लेखिका म्हणून कन्नड साहित्य वर्तुळात केंद्रभागी आहेत. कर्नाटक शासन तसेच केंद्रीय साहित्य अकादेमीच्या अनेक पुरस्कारांनी त्या सन्मानित लेखिका आहेत. त्यांच्या *क्रौंचपक्षीगळु* या कथासंग्रहाला २००९ सालचा केंद्रीय साहित्य आकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. त्यांनी मोठ्या प्रमाणात कथा लेखन केलेले आहे. ही लेखिका प्रादेशिक पातळीवरील सक्षम स्त्रीजीवनाचा अत्यंत समर्थ वेध घेणारी लेखिका आहे. एच. नागवेणी हे आणखी एक असेच समर्थ कन्नड लेखिकेचे नाव याच परिसरातून पुढे येते. वैदेही आणि एच. नागवेणी यांचे साहित्य संयुक्तपणे पाहिले की त्यांच्या प्रदेशाचे सर्वांगीण चित्र वाचकांसमोर उभे राहील. वैदेही यांच्या लेखणीतून प्रामुख्याने तथाकथित प्रतिष्ठित मध्यमवर्गीय तर एच. नागवेणी यांच्या लेखणीतून तळागाळातील संस्कृतीचे दर्शन घेता येते. येथे त्यांच्या *अस्पृश्यरू* (१९९२) या कादंबरीचा सविस्तर विचार करण्याचे निश्चित केले आहे.

वैदेही यांनी अनेक साहित्य प्रकार हाताळलेले दिसतात. *मरगीड बळ्ळी, अंतरंगद पुट* इ. कथासंग्रह *पारिजात, बिंदू बिंदिगे* हे कवितासंग्रह, *सुंटरगाळ, गोंबे म्याकबेथ* इ. हे बालसाहित्य, *सूर्य बंदा, आने मत्तु पुट, हक्की हाडु* ही नाटके, भारतीय महिलेय स्वातंत्र्यद होराटा, बेळ्ळी संकोले, संगीत संवाद हे अनुवाद तसेच *कोट लक्ष्मी नारायण कारंत, सेडियापु कृष्णभट्ट* (कन्नड विद्वान), *बी. व्ही. कारंतांची चरित्रे* इ. ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे. *मुन्ताद पुटगळू* हे त्यांचे अलीकडचे राजवाडे नावाच्या कन्नड लेखिकेवरील पुस्तक आपल्या समाज संस्कृतीत लेखन व इतर अंगीभूत कलाकौशल्ये प्राप्त स्त्रीच्या जीवनाला कसा आकार मिळत असतो त्याचे दर्शन घडवते. या कथनाची नायिका लाखात उठून दिसेल अशी सौंदर्यवती स्त्री आहे, तिने लग्न करायचे तर गर्भश्रीमंत पुरुषाशीच असे ठरवलेले असते. त्या प्रमाणे तिला स्थळ मिळतेही पण तिचा हा गव्हर्नर नवरा वयाने तिच्याहून ४० वर्षांनी मोठा असतो. काही काळाने तिला वैधव्य प्राप्त झाल्यावर त्याच्या अमाप संपत्तीची ती मालकीण बनते. उडपी परिसरातील एका स्त्रीचे जी १९८४ साली मृत्यू पावली, तिचे खुरटलेले लेखिकापण येथे चित्रित झाले आहे. त्याचबरोबर आपण प्रस्थापित समाज व्यवस्थेत या विशिष्ट आर्थिक घटकाशी संबंधित स्त्रीची मानसिकता अशी कोणत्या कारणांनी आकारली त्याचाही छडा लावू शकतो. उडपीमध्ये तिने अनेक वेगवेगळी कामे केली पण तिच्या लेखनाला एक व्यवस्थित शिस्त लावून देणारे पर्यावरण तिला उपलब्ध होत नाही याचेच कष्ट होतात. लेखिका म्हणून जेव्हा तिची मुलाखत घेतली जाते तेव्हा तिला तिच्या खाजगी जीवनाविषयी प्रश्न विचारले जातात, जे कोणाही पुरुष लेखकाला कधीच विचारले जात नाहीत. लेखन सामर्थ्य असूनही तिच्या लेखणीचा विकास होऊ न शकणारे वातावरण तिच्या वाट्यास आले यावर वैदेही यांनी या चरित्रपर कादंबरीत प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.

– १ –

*अस्पृशरू* या कादंबरीच्या कथावकाशात एक पारंपरिक ब्राह्मण कुटुंब आणि दलित यांच्या संबंधांचा लेखाजोखा चित्रित होतो. एका वेळेस येथे व्यक्तिगत पातळीवरील धर्म तत्त्वांचे अनुसरण आणि सामाजिक पातळीवरील जातीय व्यवस्थेचे अस्तित्व रेखाटण्याचा

प्रयत्न झाला आहे. लेखिकेची अत्यंत सहजपणे वास्तवाला भिडण्याची प्रवृत्ती भारतीय समाजातील जुने आणि नवे यामधील संक्रमण अचूकतेने टिपत असलेली दिसते. या कादंबरीत कौटुंबिक पातळीवरून स्त्रिया आणि पुरुष व्यक्तिरेखा चित्रित झाल्या आहेत. त्या सर्व स्त्री व्यक्तिरेखा सामाजिक प्रातिनिधिक पातळीवरील वाटतील अशा आहेत. वैदेही यांचे वैशिष्ट्य असे की चित्रित व्यक्तिरेखा या एका वेळेस म्हटले तर आपली वैयक्तिक पातळी घट्ट धरुन ठेवणाऱ्या वाटतील आणि म्हटले तर आपल्या वर्तनावर प्रस्थापित सामाजिक पातळीचा पारंपरिक प्रभाव आणि पगडा निदर्शित करतील.

मंगळूर-उडपी-शिमोगा या परिसरातील लोकजीवन दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते. अनंतमूर्ती आणि त्या एकाच परिसरातून आणि पार्श्वभूमीतून येतात. अनंतमूर्ती यांनी आपल्या लेखणीला भारतीय पातळीवरील ब्राह्मण संस्कृतीत प्रस्थापित झालेल्या वृत्ती प्रवृतींचे अत्यंत वस्तुनिष्ठ असे दर्शन घडविले. नव्या आधुनिक भानातून त्यांनी जीवनाकडे पाहण्याचा प्रघात पाडण्याचा प्रयत्न केला. वैदेही यांच्या लेखणीवर हाच संस्कार उमटलेला आहे, पण त्यांनी स्त्रीकेंद्री दृष्टीतून भाषेचे जिवंत विभ्रम सहज तत्त्वानुरूप साहित्याला बहाल करण्याची किमया केली. त्यांच्या *अस्पृश्यरू* या कादंबरीतूनही आपण त्यांच्या या वैशिष्ट्याचा प्रत्यय घेऊ शकतो.

*अस्पृश्यरू* या कादंबरीमध्ये अतिशय सूक्ष्मतेने लेखिकेने भारतीय समाजात रुजलेल्या अस्पृश्यता या संदर्भांचा खूप निराळ्या दृष्टीतून शोध घेण्याच्या प्रेरणा प्रस्तुत केलेल्या आहेत. ज्यास शिवायचे नसते त्यास अस्पृश्य असे संबोधले जाते. अस्पृश्यता हा रुढीगत अर्थ आहे. त्यात जात, संप्रदाय, धर्म या घटकांचा वास्तविक संबंध पोहचत नाही. पण दुसऱ्या दृष्टीने त्याला जातीव्यवस्थाही निगडित होते. पण या दोन्ही अर्थांना ओलांडून वैदेही येथे एक कथानक साकारण्याचा प्रयत्न करतात. जातीगत अस्पृश्यता आणि मानसिक अस्पृश्यता या दोन्हीतील सूक्ष्मता दर्शविण्याचा येथे प्रयत्न होतो. या कादंबरीमध्ये एक ब्राह्मण कुटुंब केंद्रावर्ती आहे. या कुटुंबात एक विधवा स्त्री आहे व ती दोन पुत्रांची माता आहे. तिचा मोठा मुलगा आपली दृष्टी विकसित करतो. केशवपन सोसत जगणाऱ्या या विधवेच्या मुलात अशा मानवतेच्या दृष्टीतून नव्या जाणिवा निर्माण होणे हे आपल्याला समजून घेताना अडचणीचे जात नाही. तर या मुलाने विवाह केला आहे तो एका दलित मुलीशी. जाती व्यवस्था मोडण्याचा प्रयत्न त्याने स्वतः पासून सुरू केला आहे. मात्र या प्रयत्नाला त्याच्या विधवा मातेची साथ मिळत नाही. त्याला स्वतःच्या विधवा आईशी संघर्ष करावा लागतो आहे. त्याच्या आईने त्याचे लग्न मान्य केलेले नाही. त्यांना आपल्या घरात प्रवेश दिलेला नाही.

या कादंबरीमध्ये पार्थक्का नावाच्या वृद्धावस्थेतील ब्राह्मण विधवेला अनुसरून घटनांचा पट साकार होत जातो. ती आपल्या माहेरी किंवा आपल्या गौरम्मा या बहिणीकडे त्यांच्या आश्रयाने राहत असते. समाज परिवर्तन चळवळीत भास्कर सक्रीय झाला आहे. गौरम्माचे यजमान वासुदेवराव हे घरचे प्रमुख आहेत. त्यांनाही भास्करविषयी आपुलकी आहे. त्याच्या नव्या पावलांचे कौतुक आहे.

पण प्रस्थापित समाज व्यवस्थेचा स्त्रीमनावर असणारा गडद पगडा लेखिका येथे विचारात घ्यायला लावत आहे. घरात अनेक स्त्रिया आहेत. तिची भावजयही आहे. तीही आता वृद्ध झाली आहे. घरातील ह्या सर्वच स्त्रियांवर लेखिकेला प्रस्थापित जीवन पद्धतींचा पगडा असलेला दिसतो. त्या घरची सर्व कामे अर्थातच नोकरचाकर करत असतात, ती सर्वजण विविध जाती पंथांची माणसे आहेत. पण त्यांच्या जगण्यात हा जातीचा संघर्ष उद्भवलेला नाही. त्यांचा ब्राह्मणांशी संघर्ष दिसत नाही. सर्वांनीच व्यवस्था स्वीकारलेली. उच्च कुळांना मान सन्मान देत सारेजण जगत आले आहेत. वय झालेला एक चाकर आहे त्या घरात. त्याला जेवायला घालताना दूर बसवून, वरून वाढले जाते. त्यालाही त्याचे काही वाटत नाही आणि वाढणाऱ्या व्यक्तीलाही काही वाटत नाही. सारेच व्यवस्थेला सहज असे स्वीकारत आहेत असे चित्र लेखिका कादंबरीत काढते. पण त्या सर्व माणसांच्या आतल्या आत आपापल्या जातीयतेचे भान

मात्र जागृत असलेले लेखिका अधोरेखित करते.

ब्राह्मण कुटुंबात चालत आलेल्या रुढीगत अशा अस्पृश्यतेचे स्तर चित्रित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत कादंबरीतून होतो. हा प्रयत्न अर्थातच ब्राह्मण स्त्रियांसंदर्भातून होतो हा या कादंबरीचा विशेष ठरतो. अस्पृश्यता हा घटक जगण्यात कसा कसा आणि कुठे कुठे शिरला त्याचा वेध घेण्याचा लेखिकेचा हा प्रयत्न अनोखा आहे. स्त्री जीवनात बाळंतपण, मासिक स्राव या संदर्भातून अस्पृश्यता वाट्यास येते, त्यामुळे याचा शोध समाजाशी कोणत्या पध्दतीने संबंधित होतो त्याचीही वस्तुस्थिती येथे साकार होत जाते. वैदेही यांचा स्त्रीवाद स्त्री संदर्भातून सामाजिकतेचा अचूक वेध घेणारा स्त्रीवाद आहे. लेखिका वास्तवाचा अचूक वेध घेण्याचा जो प्रयत्न करते त्या मधून जातीय घटकाची चिकित्सा होत जाते. आणि ही चिकित्सा अगदी सहजपणे होत जाते, त्यामुळे तिथे समाजातील जातीयता व तिच्या मानगुटीला बसलेली अस्पृश्यतेची भावना नेमक्या कोणत्या मुळाशी घट्ट बसली आहे याची कल्पना ही कादंबरी विचारात घेण्याची प्रेरणा वाचकाच्या हातात सोपवते. वैदेही यांनी स्त्री जीवनात दृढ झालेली बाळंतपणे आणि मासिक विटाळ या संदर्भातील अस्पृश्यता उलगडून पाहण्याचा जो प्रयत्न केला त्यामधून अपोआप सामाजिक पातळीवरील अस्पृश्यतेचे म्हणजेच जातीय श्रेष्ठ कनिष्ठतेचेही स्वरूप उलगडत गेलेले आपण या कथानकात पाहतो.

कादंबरी पार्थक्काची भाची रत्नाच्या बाळंतपणापासून सुरू होते. लग्न करून दिलेली रत्ना बाळंतपणासाठी माहेरी आली आहे. तिची आत्या पार्थक्का ही विधवा स्त्रीचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्तिरेखा लेखिकेने सविस्तरपणे रेखाटली आहे. पार्थक्का दोन मुलांची माता आहे. पैकी मोठा मुलगा तरुण वयाचा असून त्याचे आधुनिक जागरणानुसार समाजकार्य चालले आहे. अनेक प्रकारची समाजोपयोगी कामे हा तरुण करत आहे. त्याचे घरीदारी सर्वांनाच कौतुक वाटत आहे. रत्ना बाळंत झाल्यावर हे कुटुंब ब्राह्मण असून देखील दहा दिवस अस्पृश्यांसारखे होते. त्यांच्याकडे कोणी येत जात नाहीत. त्यांना कोणी शिवत नाहीत. लेखिकेने अस्पृश्यतेसंदर्भातून असे का हा प्रश्न उपस्थित केला. कारण जातीगत अस्पृश्य नसूनही हे कुटुंब दहा दिवस त्यांच्या समाजात अस्पृश्य झालेले आहे. या प्रकाराला सामाजिक मान्यता आहे पण त्याचा धर्मशास्त्रात कुठेही आधार नाही. पण तरीही त्याला धर्मशास्त्रात आधार आहे असे लोक समजतात. स्पृश्य-अस्पृश्य ही कल्पना धर्मात नाही. पण भारतीय समाजात अगदी वरच्या समजल्या जाणाऱ्या जातीतही स्त्रियांसंदर्भातून विचित्र प्रकारचे स्पृश्यास्पृश्यतेचे प्रकार दिसतात. तर या स्त्री जीवनातील वास्तवाचा वैदेही यांनी अस्पृश्यरू या कादंबरीतून शोध घेतलेला आहे.

या कादंबरीने कुंदापूर परिसराचे अत्यंत वास्तव चित्रण केले आहे. या कथावकाशात ब्राह्मण आणि दलित कुटुंबांचे एकमेकावर अवलंबून असणारे जगणे रेखाटले गेले आहे. त्या मध्ये एक पार्थक्काचे माहेर, जे सांप्रदायिक आहे व त्यांच्या घरची पडतील ती कामे करणारी, विविध खालच्या म्हणून पाहिल्या जाणाऱ्या जातीतील बाया व पुरुष माणसे आहेत. त्यातूनही या कथानकात स्त्री व्यक्तिरेखांचा आढळ जास्त आहे. वैदेही यांच्या कथा चित्रणात नेहमी अवतीभवतीच्या स्त्रियाच प्रामुख्याने चित्रित होत आल्या. प्रस्तुत कादंबरीही त्याला अपवाद नाही.

आपापल्या रूढ अशा प्रस्थापित श्रद्धांच्या विरोधात जे जातात ते अस्पृश्य होत असतात अशी एक वास्तवातील चमत्कारिक घटिते संगतवार होऊन प्रकटलेली इथे आपल्याला दिसतील. मंगळूर परिसरातून येणाऱ्या या प्रतिभावंत सूक्ष्मतेने अवलोकन करू शकणाऱ्या वैदेही सारख्या लेखिकेलाच हे दिसू शकते. प्रत्येक परिसर आपल्यात काही ऐतिहासिक अंश धारण करून असतो, आणि त्यांचा स्पर्श जर आपल्या आकलनाला झाला तर या प्रकारच्या कथावस्तू आकारू शकतात. रामानुजांचा श्रीवैष्णव संप्रदाय मंगळूर भागात मोठ्या प्रमाणात आहे आणि तिथे वैष्णव संप्रदायही आहे. या दोन्ही संप्रदायातील भेद (वैष्णव लोक श्रीवैष्णवाना आपल्या पंक्तीला घेत नाहीत) लक्षात घेतले की या कथावकाशाचे आकलन अचूकतेने साध्य होते. (कोटा(हव्यक)ब्राह्मण) या परिसरात ब्राह्मण जातीतही अंतर्गत भेदाभेद आढळतात. एक ब्राह्मण दुसऱ्या

ब्राह्मणासाठी अस्पृश्य असतो असे एक चमत्कारिक चित्र इथे रूढ आहे.) ऐतिहासिक परंपरेनुसार कुटुंबात घडलेल्या परिवर्तनांची दृश्ये येथे चित्रित झाली. या सर्व परिवर्तनाना ओलांडून जगण्याची प्रक्रिया इथे रेखाटली गेली.

कादंबरीमध्ये गावातील सर्व जातीपातीतील लहान मुले एकत्र खेळत असलेले चित्र आहे. एका प्रसंगात अस्पृश्यांची लहान मुले टाकलेल्या पानातील अन्न खाताहेत, ते गोळा करून घरी घेऊन जात आहेत. ते त्यांचे खाणे, ते खरकटे अन्न गोळा करून घरी नेण्यासाठी बांधून घेणे पाहून त्यांचे समवयस्क ब्राह्मण सवंगडी त्यांना ते खाऊ नका, घेऊ नका, ते घाण आहे असे सांगू लागतात . त्यावर दलित मुले उत्तर देताना विचारतात की मग आम्ही काय खावे? आम्ही असलेच अन्न खात असतो, चांगले चुंगले यापेक्षा दुसरे कुठले मिळणार आम्हाला? हेंच अन्न आम्ही घरी घेऊन जात असतो. दुसऱ्या एका लहान मुलांच्या प्रसंगात समाजात प्रस्थापित असणारी जातीय प्रज्ञा सामर्थ्याने लेखिकेने आविष्कृत केली. कोणी काही नाही सांगितले तरी समाजाच्या रूढ संकेत व्यूहांचे पगडे अपोआप लहान मुलांना प्रभावित कसे करत असतात आणि त्यानुसारच लहान मुले वागत बोलत असतात त्याची प्रचिती ही कादंबरी देण्याचा प्रयत्न करते. तर लहान मुलांनी गावात नाटक बसविले आहे. नाटकात गावातील सगळ्याच जातीतील मुले सहभागी झालेली असतात. नाटकात प्रसंग आहे तो रामायणातला. कैकेयीमुळे वनवास लागतो अशी समजूत अर्थातच पसरलेली आहे. वनवासाला निघताना राजकुमार आपल्या डोक्यावरची किरीटे काढतात. पण सीता झालेली मुलगी मात्र आपले किरीट डोक्यावरून काढायलाच तयार होत नाही. ती किरीट हाताने धरून ठेवते. म्हणते, राज कुमारांनी किरीट काढले म्हणून काय झाले सीतेने काढलेच पाहिजे असे कुठे आहे? आता गावकरी नाटक रंगात येऊन पाहत असताना मुलांचे वेगळेच संवाद सुरु होतात. मग मृत्यू पावलेला दशरथ उठून उभा राहतो आणि सीतेला किरीट काढायला सांगतो. पण त्याचेही मुलगी ऐकत नाही. ती म्हणते, मी खालच्या जातीतील आहे म्हणून किरीट काढून घेताय का? मग बाकी नाटकातील इतर दोन मुले जी खालच्या जातीतील आहेत तीही म्हणू लागतात की तुम्ही असे करत असाल तर पुढच्या वेळी आम्ही तुमच्या बरोबर नाटकात येणार नाही जा! तर लेखिका या प्रकारे रोजच्याच जीवनातील लहान लहान प्रसंग उचलते आणि त्यांच्यायोगे स्पृश्यास्पृश्यतेचा समाजमानसावर एक विशिष्ट पगडा कसा असतो त्याचे दर्शन घडविते. प्रासंगिक अशा घटना महत्वाच्या मानून लेखिका त्यांचे उपयोजन कादंबरीत करत जाते. बाकीची समग्र कादंबरी एक मजबूत घट्ट असा अनुभव प्रकट करते. निसर्गाची चित्रेही पार्श्वभूमीवरून येतात. त्यातूनही कथानकाला उठाव मिळतो. कथानकाला गतिशील ठेवण्यात हा निसर्गच मदत करतो. सखोल आणि नेटका अर्थ घेऊन हा अनुभव प्रकटतो. निसर्ग लोकांच्या सोबत आहे, त्यांच्या जगण्यात आपले योगदान देतो अशा पद्धतीने हा निसर्ग प्रस्तुत कथानकाचा भाग होताना दिसतो.

भारतीय समाजात ही जात जाणीव खोलवर रुजलेली आहे. पण दोघानाही एकमेकावाचून जगता येणार नाही हेही त्यांना कळलेले आहे. त्याच्या आधारेच नवनवीन प्रसंग लेखिका निर्माण करत जाते. घडणाऱ्या प्रसंगांकडे त्यातील वैविध्यतेकडे त्या लक्ष्य वळवू पाहतात. पावसाळ्यात गळती लागली तर ती काढायला जी माणसे येतात ती 'खालच्या जातीतील' असतात. पण त्यांना हे लोक अगदी प्रेमाने वागवतात. मात्र त्यांना एकीकडे प्रेमाने वागवतानाही आपण त्यांच्या पेक्षा 'वेगळे' आहोत हे दाखवण्याचे वर्तन कुठून येते हा प्रश्न लेखिका येथे उपस्थित करते. अशा तऱ्हेने सांप्रदायिक जीवनात उद्भवणाऱ्या प्रसंगांची उत्तरे शोधण्याचा हा प्रयत्न दिसतो. विशिष्ट असा देश आणि काळ यामध्ये एक परिसर निर्माण करून त्यातील एका कुटुंबाचे कथन करत असता अपोआप भव्य पट (canvas) येथे निर्माण होत जातो. त्याची प्रभावशीलता अखंड समाजाला व्यापू लागते. त्यामुळे ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

लेखिकेने या कादंबरीत प्रादेशिक भाषेचा प्रयोग अतिशय सूक्ष्मतेने केलेला आहे. येथे सांप्रदायिक परिवार

केंद्रवर्ती आहे. या परिवारात पुरुष वर्गाचा सहभाग फारच अल्प आहे. या कथावकाशात जी सहा सात स्त्री पात्रे येतात, ती सर्व सांप्रदायिक पद्धतीने जीवन जगत आहेत. त्यातून निर्माण होणाऱ्या काही विचित्र मानसिकतेतून पारिवारिक मनस्तापाचे चित्रंही येथे आहे. पण मनस्ताप भोगत असूनही ह्या स्त्रिया कुठेही उघडपणे त्यावर बोलताना दिसत नाहीत. स्त्रियांचे बोलणे मर्यादशील आहे. वरच्या आणि खालच्या स्तरावरील स्त्रियांचा सामना लेखिका वास्तवपूर्णतेने रेखाटण्याचा प्रयत्न करते. गुरांसाठी जी स्त्री चारा आणण्याचे काम करत असते तिच्याशी ह्या 'श्रेष्ठ' घरातील स्त्रिया मानवतेचे संबंध राखून असलेल्या दिसतात. तिच्याशी जिवाभावाच्या गप्पा त्या करतात. तिला काही दुखले खुपले, अडीनडी आल्या तर मदत करतात. ती गरजू स्त्रीसुद्धा हक्काने लागले तर वस्त्रपात्र मागून घेताना कचरत नाही. पार्थक्काच्या कुटुंबात आर्थिक अडचणी नाहीत. हे कुटुंब सुखवस्तू आहे. पण बाकीचा समाज मात्र गरीब राहिला आहे. हा स्तर निर्माण होण्यामागे सामाजिक आर्थिक व्यवस्था कारणीभूत झाली असावी असा भास येथे निर्माण होतो. पण आर्थिक परिस्थिती चांगली झालेला एका मोलकरणीचा भाऊ या कथानकात चित्रित होतो. तो खालच्या जातीतील असतो म्हणून त्याचा चहाचा कप धुण्यासाठी ह्या कोणीही स्त्रिया तयार होत नाहीत. लेखिकेला प्रस्थापित सामाजिकतेच्या मानसिकतेचे स्वरूप खोलातून लक्षात येत असल्याचे हे चित्रण आहे.

या कादंबरीत लेखिका समाज बांधणाऱ्या व्यवस्थेचे चित्रण करतेय असे वाटते. व्यवस्था एक माणूस दुसऱ्या माणसापासून कसे तुटेल हेच पाहते की काय असा प्रश्न येथे पडू लागतो. या दृष्टीतूनही अस्पृश्यरू हे कादंबरीचे शीर्षक मोठे समर्पक शीर्षक आहे. सर्वप्रथम 'अस्पृश्य' हा विशिष्ट संकेत तयार केला. आणि मग सर्वच लोक येथे एकमेकास अस्पृश्य करून ठेवण्याचा कसा प्रयत्न करतात त्याचे दर्शन या कादंबरीत आहे. विधवा बाईला सुद्धा व्यवस्थेने अस्पृश्य बनविली. बाहेरचा अस्पृश्य घरात येतो तेव्हा जसा तो संकोचतो तसाच संकोच घेऊन ही विधवा बाई जगत राहते. पण तरीही ती बिचारी आपले जातीय ब्राह्मण्यत्व कसे घट्ट पकडून त्याच्या प्रतिष्ठेवर राहू पाहते याचे मोठे उद्बोधक दर्शन प्रस्तुत कादंबरी घडवते. यातून अस्पृश्यता ही किती घातक पद्धतीने माणसाच्या मनाला शोषत असते त्याची प्रचिती येईल.

जाती व्यवस्था मानव निर्मित असल्याचे नवे जागरण या घरातील सर्व जणांच्या लक्षात आले आहे. पण पार्थक्का मात्र म्हणते की पारंपरिक चालत आलेल्या व्यवस्थेला आपण धिक्कारु शकत नाही. तिचा मुलगा भास्कर आपल्या दलित पत्नीला आपल्याकडील गोष्टींची कल्पना देतो. मुलगी तल्लख आहे. ती त्याने सांगितलेल्या गोष्टी आत्मसात करून घेते. पण ती कोरूवर या जातीची असल्याचे पार्थक्काला विसरता येत नाही. कोटा या ठिकाणी राहणारे कोरुवरू श्रेष्ठ समजले जातात पण त्याच्या बाहेर राहणारे कोरूवर मात्र कमी दर्जाचे ठरतात अशी इथली पद्धत! कोटा, शिवली, हव्यक, कंदावर, कोटेश्वर, मागणी या विविध जाती आपण सर्वांपेक्षा श्रेष्ठ असे समजत असतात. त्यांच्यात वाद असतात. ह्या सर्व जाती मिळून मालेर या जातीला सर्वात खालची जात समजतात. असे का करतात असे विचारले तर विधवेने जन्माला घातलेली मुले ती असे उत्तर मिळते. विधवा ही जागा अशी हीन मानली जात असल्यामुळे पार्थक्का आपली जातीय श्रेष्ठ प्रतिष्ठा सोडूच पाहत नाही. त्याच्याशिवाय पाटाळीगळू या जातीचे एक चित्र येथे रेखाटले गेलेय. लोक जेवायला पंक्तीला बसतात तेव्हा सहना भुनक्तु सहवीर्य करवावहे.. उच्चारतात. आपण सहभोजनात आहोत असे या प्रार्थनेत म्हणणारे लोक जेवताना त्यांना आडव्या रांगेत बसवितात. जातीयतेचे असे दर्शन येथे घडविले आहे. ही पूर्वापार चालत आलेली पद्धती असल्यामुळे आपल्याला त्यामध्ये बदल करता येत नाही की काय? खालच्या जातीचे आहात असे त्यांना ऐकवून ऐकवून त्यांच्यावर ते खोल रुजलेले असते. त्यामुळे त्यांना आपण वरचे आहोत असे वाटूच शकत नाही आणि वरच्या जातीच्या लोकांमध्ये तर किती मोठा अहंकार भिनतो! तो कसा नाहीसा होणार? ही व्यवस्था मानसिक रीत्या स्वीकारली गेल्यावर त्या मध्ये बदल घडविणे फार कठीण होते.

भास्करचा समानतेचा विचार खुद्द खालच्या लोकांच्या डोक्यात शिरतच नाही. असे एक क्लिष्ट वातावरण येथे आहे. आपले स्तर आपणच असे निर्माण केलेले आहेत की त्यात बदल घडविणे फार कठीण होऊन गेलेय. भास्कर जातीबाबत वेगळा विचार मांडतो. तो म्हणतो की ब्राह्मण जातीतही महार ब्राह्मण नावाची जात आहे. इतिहासात पूर्वी एका ब्राह्मण जातीतील म्हातारीला जीवाने मारून विहिरीत टाकले होते. तर ज्यांनी ते कृत्य केले होते त्यांच्या वंशजांना महार ब्राह्मण असे संबोधन आहे. ब्राह्मण जात आपले श्रेष्ठत्व कसे घट्ट धरून ठेवते त्याचेही असे व्यंग्यात्मक चित्रण लेखिका येथे धाडसाने प्रस्तुत करते. संदर्भानुसार आणि काळानुसार श्रेष्ठत्वाची वास्तविक घातक संवेदना माणसात जागृत होत गेली आणि त्यातून पुढे आलेल्या व्यवस्थेने प्रस्थापित जातीय विषम समाज दृढ करून ठेवला. ब्राह्मण लोक लिंगायताना आपल्या रांधायच्या खोलीत घेत नाहीत आणि लिंगायत ब्राह्मणांना शिवून घेत नाहीत. ब्राह्मण आणि लिंगायत एकमेकास अस्पृश्य लेखतात. अशा पर्यावरणात एक सांप्रदायिक कुटुंब नवीन परिवर्तनामध्ये आपल्याला कसे बसवू पाहतेय याचे दर्शन म्हणजे ही कादंबरी. पार्थक्का धार्मिक पातळीवर, परंपरेच्या पातळीवर विचार करत राहते. ती बदलू पाहत नाही. स्पृश्यास्पृश्यतेची कल्पना कुठल्या तरी एका विशिष्ट काळात विशिष्ट संदर्भात जन्मली आणि ती संदर्भविरहित बनून पुढे पर्यंत चालत आल्यावर त्याचे परावर्तन जातीत होऊन राहिले ही क्लिष्ट आणि कष्टदायी सामाजिक प्रक्रिया विधवा असणाऱ्या आईच्या संदर्भातून दाखविण्याचा प्रयत्न लेखिकेने करू पाहिला.

घरचे सर्वजण बदलू पाहत असताना आई पार्थक्का मात्र नवे बदल स्वीकारू शकत नाहीय. परंपरेविषयी असणाऱ्या आस्थेला तिला धक्का देता येत नाही. तिच्या झालेल्या या अवस्थेस काय म्हणावे याच्या विचारात लेखिकेने वाचकाला टाकले. वैचारिकता कमी असते की काय स्त्री मध्ये? संघर्षाचा मार्ग तिला नको असतो की काय? की मुळातून भ्रष्ट अशा समाजात स्त्रीचे जगणे किती अवघड असते याचे दर्शन ही कादंबरी घडविते. एकीकडे अनिवार्य बदल आहे आणि दुसरीकडे एक कट्टरपंथीय परंपरा आहे. पार्थक्का या कट्टर पंथाचीच प्रतिनिधी बनते आहे. करुण आहे हे सर्व.

आपण दलित आहोत असे स्वतः मान्य करून जगणे हे फार अमानुष आहे ही अत्यंत महत्त्वाची संवेदनाही येथे आविष्कृत होते. न्यूनगंड आणि अहंगंड यांच्यासह जगणे नेहमीच घातक सिद्ध होत असते, याकडे लेखिका लक्ष वळविते. मी श्रेष्ठ आहे असे गृहीतक जसे सोडावे तसेच मी कनिष्ठ आहे असे मान्य करणारी 'अवस्था' ही सुटली पाहिजे. कुंदापूरचे चित्रण अशा गंडयुक्त लोकांचे दर्शन घडविते आहे. मानसशास्त्रीय दृष्ट्या समाजातील समस्यांचे आकलन आणि विश्लेषण करण्याचे तिचे तंत्र प्रस्तुतीकरण वैशिष्ट्यपूर्ण आहे. अनंतमूर्ती यांनी कुवेंपू आणि बेंद्रे यांच्या संदर्भातून साठच्या दशकारंभी 'ब्राह्मण प्रज्ञा' आणि 'शूद्र प्रज्ञा' अशा संकल्पना देऊ केल्या होत्या, कुवेंपू शूद्रप्रज्ञेचे प्रतिनिधी तर बेंद्रे ब्राह्मण. दोघेही महान. पण तळागाळातून येणाऱ्या कुवेम्पुंच्या साहित्यात ब्राह्मण प्रज्ञा लखलखली आणि बेंद्रे यांच्या लेखणीवाटे दलित प्रज्ञा लखलखली: कुवेम्पु यांच्या दृष्टीला उच्च कुलाची भाषा हे लक्ष्य झाली तर बेंद्रे यांनी लोक पातळीशी संवादित होऊ पाहणारी आपली अद्भुत भाषा प्रस्तुत केली. अर्थात त्यांचा हा सिद्धांत फेटाळला गेला होता ही गोष्ट वेगळी. बोलीभाषेत लेखन ही 'शूद्र प्रज्ञा' असते असे ते म्हणाले होते! प्रस्तुत लेखिका धार्मिक प्रज्ञा आणि सांप्रदायिक प्रज्ञा तपासू पाहतेय. पार्थक्कावर धर्माचा आणि सांप्रदायिक प्रज्ञेचा खोल ठसा आहे, त्यामुळे तिला त्यापासून दूर जाणे जमत नाही. वास्तविक माणसाला लवचिक राहता आले पाहिजे. इकडच्यास तिकडे आणि तिकडच्यास इकडे येता जाता आले पाहिजे. प्राचीन काळात माणसे आपल्या जाती बदलत असत. ती एका वर्णातून दुसऱ्या वर्णात जात असत. विश्वामित्र याचे उदाहरण होत. कदाचित 'जात' या शब्दाला हा संदर्भ आहे की काय? (बेळगाव– रामनगरहून दीड दोन तासाच्या अंतरावर डावीकडे कारवार –काळी नदी प्रोजेक्ट– येथे शैव ब्राह्मण आणि वैष्णव यांचे अस्तित्व तर उडुपीकडे चित्रात बदल– लहान लहान गावाचे वेगवेगळे संघ असतात – जुन्या मैसूरला बोली बोलतात– मंगळूरकडे मात्र पुस्तकी

भाषा प्रधान. मात्र त्याच परिसरात स्त्रियांची भाषा मात्र बोली असते. तीन हजार रामायणे असतात)

२.

घरात स्त्रिया आपला दिनक्रम आपल्या पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीप्रमाणे चालवत असल्या तरीही घराच्या सभोवतालच्या परिसरातील परिस्थिती मात्र बदलत निघालेली आहे. मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. खुद्द याच घरातील भास्करसुद्धा त्या परिवर्तनात जवळून भाग घेत आहे. एका विधवेचा मुलगा ध्येयवादी माणूस बनला, जातपात तो मानत नाही, त्याच्या मनात स्पृश्यास्पृश्यतेचे विचार येत नाहीत हे आपल्याला समजू शकते. लहानपणापासून बापावाचून आजोळी वाढलेला तो समाजाच्या उद्धरणासाठी कार्य करू लागतो.

भास्करने दलित मुलीशी लग्नाचा निर्णय घेतला. त्यावरून गावातील दलित समाजात दोन गट पडले होते. एक गट भास्करचा निर्णय मान्य करतो तर दुसरा गट मात्र वरच्या जातीतील हा माणूस आपल्या जातीतील मुलीशी कसा काय लग्न करतोय? असे म्हणत वाद निर्माण करत आहे. पण भास्करने कोणाचेही न जुमानता लग्न केलेले आहे. आपल्या पत्नीचे नाव त्याने कुमुदिनी असे ठेवलेले आहे. तर आता त्याची पत्नी झालेल्या कुमुदिनीलाही तिच्या जातीतील लोक एकीकडे दूर करतात आणि भास्करला त्याची विधवा आई पार्थक्का दूर करते. बाकी वासुदेवराव अगर भास्करचा भाऊ शिनू हे कोणीही वाकड्यात शिरत नाहीत. पण फक्त पार्थक्काचीच ही नवी गोष्ट स्वीकारण्याची मानसिक तयारी होऊ शकत नाही. अगदी शेवटपर्यंत तिला आपल्या मुलाचे हे आंतरजातीय लग्न स्वीकारणे जमत नाही.

फार मोठ्या कोंडीत अडकलेली पार्थक्का वैदेही यांनी वास्तव पातळीवरून चित्रित केली आहे. एकीकडे पोटचा मुलगा तर दुसरीकडे तिच्यावर पारंपरिकतेने चालत आलेल्या संस्कारांचे अस्तित्व. या संदर्भातून जुन्याचा नव्याशी सुरु असणारा झगडा येथे एका विधवा आईच्या संदर्भातून रेखाटला जात आहे. पारंपरिक अस्तित्वातून निर्माण झालेली भारतीय उच्च कुलीन स्त्रीची अस्मिता नवे वारे संकटात टाकत आहेत. तिच्या संदर्भातील हा संघर्ष, या कादंबरीत स्त्रीने वास्तव नेमके लक्षात घेऊन बदलाला सामोरे जाण्याच्या दृष्टीतून, लेखिका चित्रित करत आहे. पार्थक्काच्या चित्रणातून वैदेही यांनी एक ज्वलंत अशी भारतीय स्त्री जीवनातील सामाजिक पातळीवरील समस्या ओंजळीत घेतली आहे. संस्कृती आणि धर्मतत्त्वे या संदर्भातून स्त्रियांची मानसिकता तपासण्याचा प्रस्तुत कादंबरीतून त्यांनी अवकाश उपस्थित केलेला आहे. एका वैधव्याच्या खाईत अडकलेले जीवन जगत आलेल्या स्त्रीचे समाज परिवर्तनाच्या संदर्भातील धोरण काय असू शकते याची येथे चिकित्सा करता येऊ शकते. परंपरेत राहून तिच्यात अडकलेला प्राण सोडवून घेण्याचे मार्ग त्यातून सापडतात का या प्रश्नाचा मागोवा घेणे येथे प्रस्तुत आहे.

आपण भारतीय स्त्री आणि तिच्यात खोलवर रुजलेले मातृत्व यांची एक विशिष्ट संगत नेहमी विचारसत घेत असतो. स्त्रीला आपल्या मातृत्वासंदर्भातून असलेले भान, त्याच्याशी निगडीत तिचे अस्तित्व, तिची स्त्री म्हणून असते ती प्रतिष्ठा इ. चा तिच्यावरील असलेला पगडा किंवा मातृत्वापलीकडे भारतीय स्त्रीला वेगळे व्यक्तिमत्त्वच असत नाही इ. आपल्या समजुती असतात. त्यामुळेच तर सासूसुनेतील संघर्ष हा मोठा विषय होऊन राहिला आहे आजच्या वर्तमानातही तो संपलेला नाही. पण वैदेहीची पार्थक्का मात्र आपल्याला काही निराळ्याच चिंतनास प्रवृत्त करते आहे. स्त्रीच्या अस्तित्वात भारतीय पातळीवरील सामाजिकतेच्या दर्जाच्या संदर्भात कोणता अवकाश दडून आहे? पार्थक्का ही वृद्ध विधवा स्त्री आयुष्यभर आपले जातीय श्रेष्ठत्व आपल्या अस्तित्वाच्या केंद्रवर्ती ठेवत जगत राहते असे दिसते. स्त्री संदर्भातून सामाजिक प्रतिष्ठा आणि जातीय पर्यावरण यांचा असणारा संबंध उलगडून घेण्याचा अवकाश प्रस्तुत कादंबरीतून प्राप्त होतो. पुत्र, पुत्राची इच्छा, पुत्राचे सुख एकीकडे आणि आपल्या कुलाचारांची अनिवार्यता यापैकी एक निवडण्याची वेळ आल्यावर पार्थक्का काय निवडेल? हा प्रश्न येथे लेखिकेने आपल्यासमोर ठेऊन कादंबरीची कथा चालवून पाहिली. नव्या स्त्रीवादी जागरणात 'स्त्री आणि

मातृत्व' या संदर्भातून सुरू असलेल्या नवचिंतनाचे पर्यावरण प्रस्तुत कादंबरीची कथावस्तू आकारत आहे. परंपरेत राहूनच आपल्याला आवश्यक असणारे परिवर्तन घडवायचे आहे, हे भालचंद्र नेमाडे यांचे म्हणणे येथे स्मरते. सभोवतालच्या समाज वास्तवाला नव्या संदर्भातून भिडण्याची वैदेही यांची ही स्पृहणीय हातोटी एका अत्यंत महत्त्वाच्या वस्तुस्थितीला चिंतनाच्या ओंजळीत देत आहे. पार्थक्काच्या माध्यमातून वैदेही यांनी जातीय अस्पृश्यता आणि लिंग पातळीवरून स्त्रीच्या वाट्यास येणारी अस्पृश्यता यांना एका तराजूत आणले आहे. प्रस्थापित व्यवस्थेने आपले सत्तांधत्व अबाधित राखण्यासाठी अस्पृश्यता हे अस्त्र अस्तित्वात ठेवले, त्यावर घट्ट अशा अस्मितेचे संस्कार उमटवत ठेवले. एकदा मानसिकता आकारली की मग ती बदलाला फारशी उत्सुक असत नाही. आणि हे स्वाभाविकपण व्यवस्थेच्या बरोबर पथ्यावर पडते.

पार्थक्काच्या कुटुंबात पारंपरिक रीतीरिवाजानुसार कालक्रमण सुरू आहे पण अशा वातावरणातील तरुणांनी बाहेरच्या जगात मिसळत नवीन दृष्टीतील मानवता आत्मसात करावी हे येथील संवेदन लेखिकेची भूमिका स्पष्ट करते. पण केशवपन क्रमात खंड न पडलेल्या पार्थक्काचे वर्तन मात्र तिच्या पारंपरिक धर्मानुसारच सुरु आहे. तिच्या वाट्याला आलेल्या; वैधव्य जगत राहण्याच्या क्रमाला; गावात बदलत असलेले दिवस काहीही संबंध पोहचवत नाहीत. ती तिच्या पारंपरिक धर्माने घालून दिलेल्या व्यवस्थेनुसार कट्टरपणे कालक्रमण करत येते आहे. तिचा स्वतःचा पुत्र गावात नव्या आधुनिक विचारसरणीनुसार परिवर्तन निर्माण करण्यात सक्रीय होतो. तो दलित समाजात मिळून मिसळून वागतो. त्यांच्या चळवळीत त्याने झोकून दिले. दलित मुलीशीच विवाहही केला. पण त्याचे वागणे, त्याचे विवाहासंबंधीचे निर्णय घरातील स्त्रियांना पटले नसले तरी त्यांना आपली मते दुसऱ्या कोणावरही लादण्याची सवय नसल्यामुळे त्या त्याच्या निर्णयात भाग घेत नाहीत अशी परिस्थिती येथे झाली आहे. त्याने आपले निर्णय आपण जरूर घ्यावेत, त्यात त्यांनी त्याला अडविले नाही, पण आपले स्वतःचे जगणे मात्र त्या बदलून घ्यायला तयार होत नाही आहेत. आपल्याबाबत मात्र पार्थक्का ठामपणे आपल्या पारंपरिक मताशी घट्ट चिकटून राहिलेली चित्रित झाली आहे. या विरोधाभासी तंत्राचा नवीन प्रायोगिकता म्हणून विचार होऊ शकतो. स्त्रिया कशा आहेत आणि त्यांनी कसे असायला हवे त्याचे मोठे हृदयंगम दर्शन या कादंबरीत प्रस्तुत आहे.

एकूण समाज जीवनात ज्या नव्या घडामोडी चालत आहेत त्याला या घरातील स्त्रिया कुठेही प्रत्यक्षात विरोध करत नाहीत, की कधी त्यांनी वाद घातला असे दिसत नाही. मात्र न बोलता त्या वागतात मात्र स्वतःला पटेल असेच. वास्तविक स्त्रियांचे हे वैशिष्ट्य अचूकतेने कादंबरी चिमटीत घेते. या वैशिष्ट्याचा पर्यवरणातील डोळ्यात खुपणाऱ्या घातक घटकांशी झुंजण्याचे अस्त्र म्हणून वापर करता येऊ शकेल असे अंतर्गत सूचन देतानाच पार्थक्का आपल्या मुलाला त्याने काय करावे काय नाही याबद्दल काहीच सांगत नाही पण तिच्या कृतीतून मात्र ती त्याचे आपल्याला पटत नाही, आपण ते नवे चित्र स्वीकारू शकत नाही हे दाखवते. परस्पर विरोधी वाटाव्यात अशा कृती एकमेकाजवळ ठेवून वैदेही यांची कादंबरी परिवर्तनाचा विचार सक्षमतेने पुढे नेत आहे असे म्हणता यईल.

या घरातील सर्वच स्त्रिया नव्या जीवन प्रयोगात थेट सहभाग दाखवत नाहीत. लेखिका याप्रकारे अगदी अचूकपणे स्त्रिया आणि पारंपरिकता या बाबतचे वास्तव रेखाटण्याचा प्रयत्न करते. कोणत्याही कृतीत ह्या स्त्रिया सहभागी आहेत असे पृष्ठभागावर दिसत नाही. मग स्त्रियांचा सहभाग असतो कुठे? धर्म संस्कारानुसार कर्मकांडे निष्ठेने पार पाडत राहणे हेच त्यांचे अंगवळण झालेले आहे हे आपण पार्थक्काच्या व्यक्तिचित्रणातून पाहू शकतो. धर्माने पार्थक्काला जातीय प्रतिष्ठित दर्जा दिला. पण वैधव्याची अगतिकताही दिली. जातीय दृष्ट्या ती अस्पृश्य नाही पण लिंगपातळीवरून तिच्या जीवनात धर्माने एक विशिष्ट असा आकार देऊन तिला अस्पृश्य करून ठेवले आणि त्यातून तिच्या समस्याही निर्माण झाल्या. तिने लिंग पातळीवर वाट्यास आलेले वैधव्याचे

भोग (एक प्रकारे अस्पृश्यताच) निमूटपणे सोसले आहेत. आणि तरीही मुलाने आणलेली दलित सून नाकारून तिने मातृत्वाचेही भावनिक बंध दूर सारले आहेत. भारतीय परंपरेला पाठबळ देणारी एक मजबूत घटक ही स्त्रीच कशी असू शकते याचे चित्र आपण प्रस्तुत कथावकाशात पाहू शकतो. आता यावर नेहमीप्रमाणे मंडळी जर पाहा आम्ही म्हणत नाही का की स्त्रीच नव्या गोष्टींना विरोध करत असते असे? असे म्हणतील तर हेही वरवरचेच उद्गार ठरतील. व्यवस्थेने प्रत्येकाला कोणती न कोणती प्रतिष्ठा बहाल करून सर्वांचीच मती इतकी गुंग करून ठेवलेली असते की आपल्या पावलाखाली कायकाय जळते आहे तेच कुणाला कळू नये! तर पार्थक्काच्या या प्रकारच्या लेखिकेने घडविलेल्या दर्शनामुळे परंपरांनी स्त्रियांची स्वतंत्र विचार करण्याची शक्ती कशा तऱ्हेने हिरावून घेतली आहे हे तपासायला आपण उद्युक्त होतो. आणि ही चिकित्सा प्रत्येकाच्या वर्तनाला जेव्हा ऐरणीवर ठेवते तेव्हा आपण सर्वचजण समान पद्धतीने व्यवस्थेलाच पुनःपुन्हा बळकट करत असतो हे लक्षात येईल. तेव्हा आपण सर्वांनी मिळून आपल्याला वळण लावणारी व्यवस्था नीट समजून घ्यावी लागेल. असे केले तरच आपण सर्व अंतर्गत भ्रष्टतेपासून मुक्त होऊ.

पार्थक्का, गौरम्मा, विद्या, कुमुदिनी इ. स्त्री व्यक्तिरेखा येथे चित्रित झाल्या आहेत. या सर्व स्त्रियांचे चित्रण लेखिकेने पारंपरिक सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीचे स्वरूप अचूक असे स्पष्ट होईल या बेताने केलेले आहे. जुने दिवस मागे पडत आहेत असे वाटायला लावणारे परिवर्तन या कुटुंबाला अनुभवावे लागत असताना येथील स्त्रिया काय करत आहेत आणि या कुटुंबातील पुरुष वर्ग कोणती पावले उचलतो याचे स्पष्ट चित्र लेखिका देतात. या कुटुंबात मुलींची बाळंतपणे, विधवांचे अस्तित्व, स्त्रियांचे मासिक धर्म, स्त्रियांची इतर स्त्रियांशी असणारी सांस्कृतिक नातीगोती यांच्याशी निगडित सुरू असलेल्या घडामोडी चित्रित होतात. वैधव्य आल्यापासून पार्थक्का आपल्या मुलांसह गौरम्मा या बहिणीच्या आसऱ्याने जीवन जगत आहे. तिचे दोन मुलगे भास्कर आणि शिनू तसेच गौरम्माचा नवरा वासुदेवराव ह्या मुख्य पुरुष व्यक्तिरेखा येथे भेटतात.

एका छोट्याशा गावात या घडामोडी घडताहेत. त्यामध्ये समाज सुधारणेच्या चळवळीचे अस्तित्व आहे. त्या माध्यमातून पार्थक्काचा मोठा मुलगा भास्कर सक्रीय तरुणाचे जीवन जगतोय. प्रत्यक्षात आपल्या जीवनात त्याने परिवर्तनाचे पाऊल उचललेय. दलित तरुणीशी विवाह केल्यानंतर त्या व इतर काही कारणांनी राजकारणामुळे गावकऱ्यांत दोन तट पडतात. दलितांमध्येही दोन गट पडले आहेत. एका गटाने भास्कर व कुमुदच्या लग्नाला पाठिंबा दिलाय तर दुसरा दलितांचा गट त्याला विरोध करत आहे. काही लहानसहान अशा घटना घडतात की भास्कर यास अटक केली जाते, त्याला कैदेत टाकतात. त्यामुळे त्याची दिवसात असलेली गर्भवती पत्नी घरात एकटी पडते. त्याच्या आईने – पार्थक्काने दलित सून स्वीकारलेली नाही, तिने भास्करपासून फारकत घेतली आहे. त्यामुळे त्याला आपले स्वतंत्र बिऱ्हाड करून राहावे लागतेय. त्याच्या नवीन थाटलेल्या बिऱ्हाडी त्याचा लहान भाऊ व इतर घरची माणसे ये जा करतात. त्याच्या नवविवाहित पत्नीच्या स्वयंपाकाची पार्थक्काकडे तोंड भरून स्तुतीही करतात. कुमुदिनीच्या स्वभावाचे, घर लख्ख सजविण्याचे कौतुक करतात. पण त्या सांगण्याचा काहीही परिणाम पार्थक्कावर होऊ शकत नाही. ती सुनेकडे वळत नाही.

सामाजिक पातळीवर सुरू असलेल्या गदारोळात एकीकडे भास्कर कैदेत अडकतो आणि दुसरीकडे नेमके तेव्हाच कुमुदिनीचे बाळंतपण जवळ येऊन ठेपलेले आहे. कुमुदिनी अवघडलेल्या अवस्थेत असतानाच अशी एकटी पडली आहे. मुलगा आणि सुनबाई या प्रकारे अडचणीत आल्यावर वासुदेवराव सरळ तिला आपल्याकडे घेऊन यायचे ठरवितात. पार्थक्काला आपला तो विचार सांगतात. पण त्यांचे म्हणणे ऐकल्यावर ती त्याला कोणताच दुजोरा देत नाही. कुमुदिनीला तिच्या जातीनेही जवळजवळ वाळीत टाकलेले असताना आपण तिच्या अडचणीच्या वेळी जर धाऊन गेलो नाही तर ती असहाय एकटी स्त्री अवघड वेळी काय करेल, कोणाकडे जाईल ही चिंता वासुदेवराव व घरातील सर्वचजन व्यक्त करतात. पण

तरीही भास्करची आई आपल्या भूमिकेपासून हटत नाही.

अखेरीस पार्थक्कापुढे वासुदेवराव हात टेकतात. शेवटी तिला पटो वा न पटो कुमुदिनीला आपल्या घरी आणायचेच असे ठरवून मोकळे होतात. भास्करचा लहान भाऊ शिनू आणि ते असे दोघे मिळून सुनबाईला घेऊन यायचे या उद्देशाने भास्करच्या घरी जातात. बाळंतपण जवळ आलेल्या कुमुदिनीसमोर आपल्या सासरी येण्याचा प्रस्ताव ठेवला जातो. पण कुमुदिनी चक्रावून जाते. तिला भास्करच्या आईचा कर्मठपणा ठावूक असतो. लग्न झाल्यापासून अजून तिने आपल्या सासूबाईंना एकदाही पाहिलेले असत नाही. सासूबाई आपल्याला स्वीकारु शकत नाही आहे हे तिला माहिती असते. त्यामुळे प्रथम ती नकार देते. आपण त्या घरी गेलो तर सर्वांना त्रास होईल असे तिला वाटते. वासुदेवराव आणि ती जेलमध्ये भास्करला जाऊन भेटतात. तिथे घरी जाण्याबाबत चर्चा होते. आपल्या बायकोने घरी जायचे की नाही याचा निर्णय भास्कर कुमुदिनीवरच सोपवतो. सुरुवातीला ती नाही जात म्हणते पण वासुदेवरावांनी बाळंतपणाची कल्पना दिल्यावर, अशा अवघड परिस्थितीत त्यांना आपली सून आपल्या घरी असायला हवी आहे असे सांगितल्यावर; काहीशी जबरदस्ती केल्यावर ती अखेरीस सासरी येते. एक दलित कन्या ब्राह्मणाघरी सून म्हणून येऊन दाखल होते.

दलित मुलीने कर्मठ ब्राह्मणाघरची सून झाल्यावर परिस्थितीच्या अपरिहार्य कारणांनी बाळंतपणासाठी सासरी प्रत्यक्षात येण्याचा हा प्रसंग भारतीय सामाजिक परिस्थितीची पार्श्वभूमी पाहता महत्त्वाचे परिवर्तन नोंदविणारा प्रसंग आहे. रूढ प्रथांसमोर माणुसकीचा धर्म खरा हृदयस्पर्शी धर्म आहे याची प्रचिती देणारा हा प्रसंग लेखिकेने चित्रित केला आहे. सासरच्या घरात सुनेचे स्वागत होतानाही लेखिकेने रेखाटले आहे. तिचा दीर, गौरम्माची मुलगी, गौरम्मा असे सारेचजण तिच्या भोवती भोवती करु लागतात. तिच्यासाठी कौतुकाने चहा पाणी असे सारे आदरातिथ्य सुरु असतानाच अचानक सर्वांना पार्थक्काची आठवण होते. कुठे आहे पार्थक्का? सर्वांनाच प्रश्न पडतो. घरभर ती कुठेच दिसत नाही. सुनेसमोर ती आलेली नसते. गोंधळून सगळीकडे पार्थक्काचा शोध घेतला जातो. बाहेर बागेत पाहतात, घराच्या सभोवताली शोध घेतात, अगदी विहिरीत सुद्धा जीव दिला की काय म्हणून डोकावून पाहिले जाते.

शेवटी वासुदेवरावांना देवघरातच अंधारात एका कोनाड्यात मुटकुळे होऊन ती सुनसान बसलेली दिसते. तिला तशी बसलेली पाहून वासुदेवराव समजूत काढत म्हणतात, तुमची सून घरी आली आहे, तिचे स्वागत करायचे सोडून इथे का बसता? माणुसकीच्या धर्माने पाहा, तिची अवघड परिस्थिती पाहा, अशा अवस्थेत तिला आपल्या घराने आधार द्यायला नको का? बाहेर तरी येऊन पाहा की आहे तरी कशी तुमची सून... पण या बोलण्यालाही पार्थक्का काहीच दुजोरा देत नाही. मग ते पार्थक्का येथे आहे; येथे देवघरात आहे असे सांगत बाहेर जातात.

ते ऐकून बाहेर असलेले सर्व कुटुंबीय आत येतात; पण पाहतात तर पुन्हा देवघरातून पार्थक्का गायब झालेली असते! वासुदेवराव बाहेरच्या दिशेकडे वळताच पार्थक्का देव घरातून उठून कोपऱ्यातील शिडी सरसर चढून माळ्यावर गेलेली असते. माळ्यावर सगळीच अडगळ आहे. त्या अडगळीच्या सामानात तिने बसून घेतलेले आहे. गच्च अंधार असलेली अडगळीची जागा ती. तिथे सगळे जुने मोडकळीचे सामान टाकलेले असते. त्यातच ही बाई एका कोपऱ्यात उगीच आपली जाऊन बसते! जुन्या पारंपरिक रूढीरिवाजाबरहुकुम वागणारी ही स्त्री बदलत्या काळानुसार जर बदलली नाही तर तिची जागा अशा अडगळीत आहे हे सूचन कादंबरीचा हा शेवटचा प्रसंग करतो. बाकीचे सारे बदलले आहेत पण पार्थक्का बदलू शकत नाही, जे बदलू शकत नाहीत त्यांचे अस्तित्व येथे चित्रित करण्याचा हा प्रयत्न वैदेही यांच्या अस्पृश्यरू या कादंबरीत होतो. जुन्या समजुती, संकेत, संकल्पना हे सारे आता नव्या युगात अडगळीत जात आहे, जशी जशी मानवता धर्माची मूल्ये पृष्ठभागावर येतील तसे ही जुनी जीवन पद्धत अडगळीतच जाईल असे सूचन लेखिकेने प्रत्ययकारकतेने या कथानकाच्या द्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

ब्राह्मण कुटुंबातील स्त्रीची पारंपरिक मानसिकता आणि आधुनिक काळात प्रवेशत असलेले सामाजिक परिवर्तन यामधील संघर्ष वैदेही यांनी प्रस्तुत कादंबरीत चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आज जे सामाजिक बदल होत आहेत त्याला पारंपरिक पद्धतीने जगत असणारी ही एक विशिष्ट स्त्री कशी सामोरी जात आहे ते आपल्यासमोर ही कादंबरी ठेवते. वास्तविक ही स्त्री स्वतः पूर्ण मोकळी आहे, तिच्या जीवनात तिला असे कर आणि तसे कर असे म्हणणारे आज अन्य कोणीही नाही, तिची ती म्हटले तर स्वतंत्र आहे मग तिचा हा संघर्ष कोणत्या कारणाने चालतो हा प्रश्न येथे उपस्थित होतो. पारंपरिक मूल्य व्यवस्था आणि बदलणारी नवी मूल्यव्यवस्था यामधील हा संघर्ष आहे. नवीन माणसे त्यांच्या पद्धतीने जगत आहेत तर त्यांना हवे तसे जगू द्यावे पण आपल्या स्वतःत मात्र त्यांच्यासाठी काही नवे बदल करण्याची त्यांची तयारी नाही. पार्थक्का दलित जातीतील मुलीला आपली सून म्हणून स्वीकारू शकत नाही हे वास्तव लेखिका येथे रेखाटते. स्त्रीचे विशिष्ट अनुभव विश्व आणि पारंपरिक जीवन नीती यामधून आकारलेले अनुभवविश्व यांचा लेखिकेने येथे जो सामना घडविला तो अनेक गोष्टी स्पष्ट करून घेण्यात सहायक ठरतो.

पार्थक्काची मानसिकता संकुचित झाली ती कोणत्या कारणाने? या प्रश्नाचा मागोवा घेण्याचा आपण येथे प्रयत्न करू शकतो. पार्थक्का वैधव्य सोसत आलेली स्त्री. त्यामुळे एका अर्थी ती तिच्या समाजात अस्पृश्यच आहे. फक्त तिला लाभलेली एकमेव सामाजिक प्रतिष्ठा म्हणजे तिचा उच्च ठरविल्या गेलेल्या जातीतला जन्म. तोच तिच्या सामाजिक प्रतिष्ठेचा एकमेव भाग आहे का? शिवाय स्त्री मनावरचे संस्कार नेमके तिला काय शिकवत आले त्याचीही कल्पना याच कथावस्तुत वैदेही गौरम्माच्या मुलीच्या संदर्भातून देण्याचा प्रयत्न करतात. गौरम्माची मुलगी जेव्हा शाळेत जाणारी बालिका होती तेव्हा अचानक तिला आई आज शाळेत जायचे नाही म्हणते आणि अंधाऱ्या खोलीत चार दिवस बसवून ठेवते. त्या दिवसापासून स्त्री असण्याची वेगळी जाणीव तिच्या घरचे संस्कार तिच्यात कसे निर्माण करत जातात याची वर्णनात्मक चित्रे लेखिकेने येथे काढली आहेत.

कुमुदिनी दलित जातीत जन्मलेली असली तरी ती स्त्री धर्मीयच आहे ना. पण तरीही आपल्या मुलाने निवडलेल्या सुनेला पार्थक्का ही स्त्री स्त्रीपणाचे अगदी वैधव्याचे भोग सोसलेले असूनही अखेरपर्यंत का स्वीकारू शकत नाही? कादंबरीचा शेवटचा प्रसंग वाचकाला अगदी विचारात टाकतो. पण लेखिकेने पार्थक्कालाच अडगळीत बसलेले चित्रित करून त्यामधून कोणते सूचन देऊ पाहिले? असे काही प्रश्न आपल्यासमोर निश्चितपणे समोर येतात. बदलत्या दिवसांबरोबर पार्थक्का जर राहिली नाही तर ती अर्थातच अडगळ बनणार असे लेखिकेला म्हणायचे आहे की पार्थक्काला आपण अडगळीत गेलो तरी चालेल असे वाटत आहे? एकूण प्रस्थापित समाज व्यवस्थेत निर्माण झालेली एका पारंपरिक स्त्रीची चटका लावणारी शोकात्मिका प्रस्तुत कादंबरी मांडते आहे हे मात्र खरे. एकूण धर्म आणि संस्कृतीचे अस्तित्व स्त्रीला इतके महत्त्वाचे वाटते तर..

पार्थक्काच्या संदर्भातून कादंबरीत छोटे छोटे कौटुंबिक प्रसंग रेखाटले आहेत. विधवा आईच्या मुलाने स्वतःला सामाजिक चळवळीत झोकून दिलेले आहे. आणि म्हणून त्याची आई त्याच्या घरी जात नाही, त्याला आपल्या घरी घेत नाही. स्त्री बदलल्याशिवाय भारतीय समाजात आंतरिक परिवर्तने शक्य होणार नाहीत याचे सूचन इथे आपल्याला मिळते. त्या शिवाय आईपण एकीकडे आणि समाजाची जातीय प्रतिष्ठा एकीकडे अशी परिस्थिती निर्माण करून लेखिका या दोन्हीतील सामाजिक जातीय प्रतिष्ठा भारतीय उच्च कुलीन स्त्रीला अधिक महत्वाची वाटते हे वास्तव चित्रित करते आहे. लेखिकेने येथे भारतीय समाज प्रतिष्ठांच्या वस्तुस्थितीची सखोल वैशिष्ट्यपूर्ण चिकित्सा प्रस्तुत केली आहे. मातृत्त्वाचे परंपरेत जे महनीयत्व बिंबवले गेलेय त्याचीही डोळस चिकित्सा करण्याची, त्यावरील चिंतनाची महत्त्वपूर्ण दिशा येथे प्राप्त होते. एकूण वैदेही यांची *अस्पृश्यरु* (अस्पृश्य) ही सामाजिक, सांस्कृतिक पातळ्यांचा सखोल विचार करायला लावणारी कन्नड साहित्यकृती आहे.

◆